# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोननं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
Email -jtdirrom@gmail.com Website – www.jdteromumbai.com


परिपत्रक

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक -१/२०१५/ 1389
दिनांक 07 MAY 2015

प्रति ,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय अनुदानित /
विनानुदानित पदविका/पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या संस्था (मुंबई विभागांतर्गत संस्था)

विषय :- रॅगिंग प्रतिबंध ॲक्टबाबत
संदर्भ :- संचालकांचे पत्र क्र.२/एनजीसी/रगिंग –परिपत्रक/२०१५/६२०दि.२३/०४/२०१५

शासन पत्र क्रमांक संकीर्ण –(१०९८/११३/९८) विशी-३,दि.२७/०५/१९९९ अन्वये रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ दि.०१/०६/१९९९ पासून अंमलात आलेला आहे.

आपणास कळविण्यात येते की, रॅगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९ च्या ठळक प्रती संस्थेच्या आवारात,वर्गामध्ये,कॅन्टीन आणि वसतिगृह या ठिकाणी विद्यार्थ्यांच्या निदर्शनास येईल अशा पद्धतीने प्रसिध्द कराव्यात. तसेच प्रथम वर्ष विद्यार्थ्यांची व वरिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या बैठका आयोजित करून त्यांना अधिनियमासंबंधी सूचना देण्यात याव्यात. रॅगिंग प्रकरण संस्थेत घडणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी. जर रॅगिंग प्रकरण घडल्यास संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

रॅगिंग प्रकरण घडू नये म्हणून खालील सूचनांचे पालन करण्यात यावे.

१. प्राचार्य,उपप्राचार्य,रेक्टर यांची निवासस्थाने कॉलेज व हॉस्टेल केम्पसमध्ये असावीत.
२. त्यांनी दररोज आकस्मिक भेटी,विशेषतः हॉस्टेलना रात्रीच्या वेळी भेटी देण्यात याव्यात.
३. संस्थेच्या माहिती पुस्तिकेत यांचे स्पष्टीकरण असावे व दरवर्षी प्रत्येक विद्यार्थी व पालकांकडून संबंधित विद्यार्थी रॅगिंगपासून दूर राहील असे प्रतिज्ञापत्र भरून घ्यावे.
४. वर्षातून एकदा संस्थास्तरावर पालकांचे मेळावे वर्षभरात एक दोन वेळा आयोजित करावेत व संस्थेची शिस्त आणि विद्यार्थ्यांचे वर्तन या बाबींची त्यातून माहिती द्यावी.
५. विद्यार्थी परिषदांनी आपल्या कार्यक्रमातून रॅगिंग विरुध्द आवाज उठवावा.

( प्रमोद अ.नाईक )
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म. रा. मुंबई यांना माहितीस्तव सादर